**नागपूर, दि. 09 डिसेंबर, 2015**

# केळी या फळाचा शालेय पोषण आहारात समावेश
# हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेणार
# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

**- एकनाथराव खडसे**

नागपूर, दि.09 डिसेंबर : महाराष्ट्रात सुमारे 80 हजार हेक्टर क्षेत्रावर केळीची लागवड केली जाते. त्यापैकी एकटया जळगांव जिल्हयात 60,000 हेक्टरवर केळीचे पीक घेतले जाते. गेल्या 10-15 वर्षापासून केळीचे भाव सतत घसरत आहेत. परीणामी केळी उत्पादन करणारा शेतकरी मोठया आर्थिक संकटात सापडला आहे. या संकटातून त्याला बाहेर काढण्यासाठी पिकलेली केळी या फळाचा समावेश शालेय पोषण आहारात करण्याचा निर्णय घ्यावा. तसेच, केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या गटाला केळी पिकविण्यासाठी रायपनींग सेंटर उभे करण्यासाठी केळी पासून पावडर बनविण्यासाठी शासनाकडून मदत देण्यात यावी. असे निवेदन आज राज्याचे कृषीमंत्री एकनाथराव खडसे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

विधीमंडळाचे नागपुरातील अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयावर निश्चितपणे सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी यावेळी दिले.

केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने आज मंत्री एकनाथराव खडसे यांच्या नेतृत्वाखालील नाशिकचे पालकमंत्री गिरीषभाऊ महाजन तसेच आमदार डॉ.गुरुमुख जगवाणी, सर्वश्री उन्मेश पाटील, गुलाबराव पाटील, सुरेश दामू ऊर्फ राजूमामा भोळे, चंद्रकांत सोनवणे, संजय सावकारे, शिरीष चौधरी, सौ.स्मिता वाघ या आमदारांच्या समावेश असलेल्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली व याबाबतचे निवेदन त्यांना दिले.

------

**कृपया प्रसिध्दीसाठी** **जनसंपर्क अधिकारी**